

  

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशङ्करप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥

जयांचे केलिया स्मरण । होय सकळ विद्यांचे अधिकरण । तेचि वंदूं श्रीचरण । श्रीगुरूंचे ॥१॥
जयांचेनि आठवे । शब्दसृष्टी आंगवें । सारस्वत आघवें । जिव्हेसि ये ॥२॥
वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारुखे म्हणे । रस होती वोळंगणे । अक्षरासीं ॥३॥
भावाचें अवतरण । अवतरविती निज खूण । हाता चढे संपूर्ण । तत्त्वबोध ॥४॥
श्रीगुरूंचे पाय । जैं हृदय गिंवसूनि ठाय । तैं एवढें भाग्य होय । उन्मेषासी ॥५॥
ते नमस्कारोनि आता ।...

सच्चिदानन्दरूपाय विश्वोत्पत्त्यादिहेतवे । तापत्रयविनाशाय श्रीकृष्णाय वयं नुमः ॥१॥
यं प्रव्रजन्तमनुपेतमपेतकृत्यं द्वैपायनो विरहकातर आजुहाव ।
पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनेदुस्तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि ॥२॥

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट् तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥
सत्यं परं धीमहि । सत्यं परं धीमहि ॥

श्वेतपद्मासना देवी श्वेतपुष्पोपशोभिता । श्वेताम्बरधरा नित्या श्वेतगन्धानुलेपना ।
श्वेताक्षसूत्रहस्ता च श्वेतचन्दनचर्चिता । श्वेतवीणाधरा शुभ्रा श्वेतालङ्कारभूषिता ।
वन्दिता सिद्धगन्धर्वैरर्चितासूरदानवैः । पूजिता मुनिभिः सर्वैर्ऋषिभिः स्तूयते सदा ।
स्तोत्रेणानेन तां देवीं जगद्धात्रीं सरस्वतीं । ये स्तुवन्ति त्रिसन्ध्यायां सर्वा विद्या लभन्ति ते ॥

वंशीविभूषितकरान्नवनीरदाभात् पीताम्बरादरुणबिम्बफलाधरोष्ठात् ।
पूर्णेन्दुसुन्दरमुखादरविन्दनेत्रात् कृष्णात्परं किमपि तत्त्वमहं न जाने ॥

ध्यानाभ्यासवशीकृतेन मनसा तन्निर्गुणं निष्क्रियं ज्योतिः किञ्चन योगिनो यदि परं पश्यन्ति पश्यन्तु ते ।
अस्माकं तु तदेव लोचनचमत्काराय भूयाच्चिरं कालिन्दीपुलिनोदरे किमपि यन्नीलं महो धावति ॥

समचरणसरोजं सान्द्रनीलाम्बुदाभं जघननिहितपाणिं मण्डनं मण्डनानाम् ।
तरुणतुलसिमालाकन्धरं कञ्जनेत्रं सदयधवलहासं विठ्ठलं चिन्तयामि ॥

ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहं तीर्थास्पदं शिवविरिञ्चिनुतं शरण्यम् ।
भृत्यार्तिहं प्रणतपालभवाब्धिपोतं वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ॥

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीविठ्ठलाय नमः ।
श्रीमातापितृभ्यां नमः । श्रीगुरुभ्यो नमः ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ।

रामकृष्णहरि । रामकृष्णहरि । रामकृष्णहरि ॥

जय हो जय श्रीभागवता । आरती करू तुज भगवंता ॥ध्रु॥

श्रीशुकमुनीने । परमभक्तिने । नानापरीने । गाइयले ज्या हरि चरिता ॥१॥ आरती करू तुज भगवंता ॥ध्रु॥

वेदतरूचे मधुर फळ । स्वादुरसे जे सोज्वळ । आत्माराम मुनी सकळ सेवुनि झाले जन सुफळ । महा पर्वणी । आली अवनी । की अघहरणी । भवजलतरणी ती पतिता ॥२॥ आरती करू तुज भगवंता ॥ध्रु॥

येथे व्यासांची वाणी । सार्थक हरिगुण गाऊनी । शास्त्रपुराणे मुकुटमणी । परमप्रेमामृत जननी । सहज सेविता । भाविक भक्ता । उदार दाता । मोक्ष तत्त्वता दे हाता ॥३॥ आरती करू तुज भगवंता ॥ध्रु॥

गमते जणु मानसतीर्थ । द्वादश सोपाने युक्त । निर्मल भक्तिजले भरित । विहरे हरि हंसचि चित्त । श्लोक सुकमळे । संत द्विजकुळे । सेवुनि रमले । भान हरपले रस पिता ॥४॥ आरती करू तुज भगवंता ॥ध्रु॥

अपार महिमा ग्रंथाचा । वदवेना कोणा साचा । प्राणचि कीर्तनकारांचा । मेवा कविवर संताचा । जणु बोधाचा । स्वयंप्रभेचा । द्वादश कळिचा । रवि अंतरीचा । तमहर्ता ॥५॥ आरती करू तुज भगवंता ॥ध्रु॥

ग्रंथ नव्हे हा श्रीकृष्ण । गीते वेधी मनपूर्ण । अनन्य होता या शरण । खचित टळे जन्म मरण । त्रिताप जाती । चिर ये शांती । नाथही वदती । कृष्णपदी ठेवूं माथा ॥६॥ आरती करू तुज भगवंता॥ध्रु॥

भानुदासाचें कुळीं महाविष्णुचा अवतार । क्षेत्र प्रतिष्ठान वस्ती गोदातीर ॥१॥
ओवाळूं आरती स्वामी एकनाथा । तुमचें नाम घेतां हरे भव भय चिंता ॥ध्रु॥
जनार्दनाची कृपा दत्तात्रयाचा प्रसाद । भागवती टीका नारायण आत्मबोध ॥३॥
ब्रह्मा विष्णु महेश ज्यासी छळावया येती । न ढळे ज्याची निष्ठा होय एकात्मता भक्ति ॥४॥
कावडीनें पाणी ज्या घरीं चक्रपाणि वाहे । अनन्य भक्ति भावें निळा वंदी त्याचे पाय ॥५॥

इंद्रायणीचे तटीं धरिला रहिवास । विश्व तारावया लक्ष्मी निवास ।
ज्ञानेश्वररूपें धरिलें निजवेष । वर्म जाणें तया सद्गुरु उपदेश ॥१॥
जयदेव जयदेव जय ज्ञानदेवा । जीवाशिवाचा आदि परब्रह्म ठेवा ॥ध्रु॥
कृष्ण एकादशी कार्तिकमासीं । आपण पंढरीनाथ सनकादिकांसी ।
यात्रेसी येताती स्वानंदरासी । दर्शन घडे तयां निजमुक्ति देसी ॥२॥
म्हैसीक पुत्र केला वाचक वेदाचा । प्रतिष्ठानीं गर्व हरिला विप्रांचा ।
विशेष अर्थ केला भगवद्गीतेचा । प्रत्यक्ष द्वारीं शोभे पिंपळ कनकाचा ॥३॥
सनकसिद्धगणांमाजीं तूं श्रेष्ठ । ज्ञानावरी माजी ज्ञानवरिष्ठ ।
अनुताप दीप्ति विश्व घनदाट । नामयावरि लोटे प्रेमाचा लोट ॥४॥

आरती ज्ञानराजा । महाकैवल्य तेजा । सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥१॥ आरती ज्ञानराजा ॥ध्रु॥
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी । अवतार पांडुरंग । नांव ठेविलें ज्ञानीं ॥२॥ आरती ज्ञानराजा... ॥ध्रु॥
प्रगट गुह्य बोलें । विश्व ब्रह्मचि केलें । रामा जनार्दनीं । पायीं टकचि ठेलें ॥३॥ आरती ज्ञानराजा... ॥ध्रु॥

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरु धामा । सच्चिदानंद मूर्ति । पाय दाखवी आम्हां ॥१॥ आरती तुकारामा ॥धृ॥
राघवें सागरांत । पाषाण तारियेलें । तैसें या तुकोबाने । अभंग रक्षियेलें ॥२॥ आरती तुकारामा... ॥धृ॥
तुकितां तुळणेसी । ब्रह्म तुकासी आलें । म्हणोनि रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥३॥ आरती तुकारामा... ॥धृ॥

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनी पाहिन रूप तुझें ॥१॥
प्रेमें आलिंगीन अनंत पूजीन । भावें ओंवाळीन म्हणे नामा ॥२॥

॥ विठ्ठल रखुमाई विठोबा रखुमाई ॥

हेंचि व्हावी माझी आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥१॥ पंढरीचा वारकरी । वारी चुको नेदी हरि ॥२॥
संतसंग सर्वकाळ । अखंड प्रेमाचा सुकाळ ॥३॥ चंद्रभागें स्नान । तुका मागे हेंचि दान ॥४॥

आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळा । माझीया सकळां हरीच्या दासा ॥१॥ कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । हें संतमंडळी सुखी असो ॥२॥ अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासां भविकांसी ॥३॥ नामा म्हणे तयां असावें कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग ॥४॥

मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरी पाहें पांडुरंगा ॥१॥ या संतासी निरवीं हेंचि मज देई । आणिक दुजें कांहीं न मागें तुज ॥२॥ तुका म्हणे आतां उदार तूं होई । मज ठेवीं पायीं संताचियां ॥३॥

## ॥ ज्ञानदेव तुकाराम ॥